नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १६/०१/२०२६ (शुक्रवार )

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद
# २ वाहनांसह ६० लाख ७७ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त
# उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक १५/०१/२०२६ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी बायपास चौक, उमरेड येथे नाकाबंदी केली असता वाहन क्रं १) १२ चक्का ट्रक क्र. एम एच ३४ बी झेड ११०१ आणि वाहन क्रं २) १२ चक्का ट्रक क्र एम एच ४०सी टी ००७३ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **दोन्ही चालकांना विचारपुस केली असता वाहन क्रं १) चा चालक विकास रवि देवाडे, वय २२ वर्ष, रा. टेकाडी, ता. पवनी, जि. भंडारा आणि मालक संजय महादेव दहिवले, रा. महालगाव, ता. पवनी, जि. भंडारा अशी माहीती प्राप्त झाली तसेच वाहन क्रं २) चा चालक अंनता शिवशकर सावरबांधे, वय २० वर्ष, रा. शिरसाळा, ता. पवनी, जि. भंडारा आणि मालक हरीचंद्र पुडलिक नागपुरे, रा. नांदेड, ता. लांखादुर, जि. भंडारा अशी माहीती पोलीसांनी प्राप्त झाली. नमुद चालक आरोपीतांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांच्याकडे असलेल्या परवान्यापेक्षा** वाहनांमध्ये जास्त रेती मिळुन आली.

**पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद दोन्ही वाहने किमती ६०,००,०००/— रूपये आणि वाहन क्रं १ मधुन ९ ब्रास रेती आणि २ मधुन ६.५ ब्रास रेती अशी एकुण १५.५ ब्रास रेती किंमती ७७,५००/— रूपये असा एकुण ६०,७७,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोस्टे उमरेड येथे कलम ३०३ (२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक अधिनियम ,कलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम **अन्वये २ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.**






## २४ तसाच्या आत शेतातील चेरीचे २ गुन्हे उघड, ६ आरोपी अटक दोन्ही गुन्हयातील चोरी गेलेला किंमती २० हजार ५०० रूपयांचा संपुर्ण मुद्‌देमाल जप्त,अरोली पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन अरोली :–** पोलीस स्टेशन अरोली अंतर्गत दिनांक १५/०१/२०२६ रोजी शेतातील चोरी चे दोन गुन्हे दाखल आहे.

**१)** फिर्यादी प्रमोद मुलचंद बरबटे, वय ४९ वर्ष, रा. निमखेडा, ता. मौदा, जि. नागपुर यांनी तक्रार दिली की, निमखेडा शिवारातील त्यांचे शेतातुन दिनांक १०/०१/२०२६ रोजी **३ धानाचे पोते** आणि ट्रक्टर मधील जुनी वापरती बॅटरी अज्ञात चोरटयांनी चोरी केले अशा फिर्यादीच्या रीपोर्ट वरून पोलीस स्टेशन अरोली येथे कलम ३०३(३), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद आहे.तसेच **२)** फिर्यादी नामे रामय्या सामय्या मुदन्ना, वय ६१ वर्षे,रा. प्लॉट न. ००३ तिम्मा समुद्रम्म, ता. नागुउपलपाडु जि. प्रकाशम (आध्रप्रदेश) ह. मु. झुल्लर ता. मौदा जि. नागपुर यांनी तक्रार दिली की, मौजा अडेगांव शिवारातील त्यांचे शेतात दिनांक १४/०१/२०२६ रोजी ४ बोरे कापुस अंदाजे १ क्विटल काढला होता. कापुस नेण्यासाठी साधन नसल्याने कापुस शेतालगत असलेल्या कॅनल जवळ ठेवला होता. अज्ञात चोरटयांनी फिर्यादीने ठेवलेला अंदाजे १ क्विंटल **कापुस चोरी** केला. अशा फिर्यादीच्या रीपोर्ट

वरून पोलीस स्टेशन अरोली येथे कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद केला होता.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात अरोली पोलीसांनी वर नमुद दोन्ही गुन्हयात कसुन तपास करून गुप्तबातमीदारांच्या माहीतीच्या आणि तांत्रिक पुराव्यांच्या अधारे दिनांक १५/०१/२०२६ रोजी **धान चोरीच्या** गुन्हयात **आरोपी नामे १) अमित अर्जुन पटिये, वय ३१ वर्ष रा निमखेड़ा २) सोनू उमाशंकर बिसेन, वय ३२ वर्ष,३) रोहित रामू मूर्खे, वय २६ वर्ष ,४) रितिक रामू मूर्खे, वय २३ वर्ष,५) नाशिक गौरीशंकर मानकर, वय २७ वर्ष सर्व रा. आदिवासीनगर, नीमखेड़ा** यांना ताब्यात घेवुन नमुद आरोपीकडे सखोल आणि कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी गुन्हा केल्याबाबत कबुली दिली. पोलीसांनी नमुद आरोपींकडुन गुन्हयात चोरीस गेलेले ३ धानाचे पोते किंमती ६५००/— रुपये, ट्रॅक्टर बॅटरी किंमती ७,०००/— रुपये असा एकूण १३,५००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. **आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

**कापुस चोरीच्या** गुन्हयात **आरोपी नामे पवन मधुकर वरठी, वय २३ वर्ष, रा. घोरपड, ता.मोहाडी, जि भंडारा** यास ताब्यात घेवुन नमुद आरोपीकडे सखोल आणि कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने गुन्हा केल्याबाबत कबुली दिली. पोलीसांनी नमुद आरोपीकडुन गुन्हयात चोरीस गेलाला मुद्देमाल १ क्विंटल कापूस किंमती ७,०००/— रुपये जप्त केला आहे. **आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

**अरोली पोलीसांनी नमुद दोन्ही गुन्हे दाखल झाल्यानंतर अवघ्या २४ तसात उघडकीस आणुन चोरी गेलेला संपुर्ण मुद्देमाल किंमती २०,५०० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

## अवैधरित्या जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०२ गुन्हे नोंद रोख रक्कमेसह ३२ हजार ६०० रूपयाचा मुद्देमाल जप्त कन्हान पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक १५/०१/२०२६ रोजी कन्हान पोलीसांना अवैध जुगाराबाबत मिळालेल्या माहीतीच्या आधारे, मौजा एम जी नगर आणि मौजा सत्रापुर परिसरात अवैधरित्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांवर दोन ठिकाणी छापा

टाकुन ५२ ताशपत्ते व रोख रक्क्म असा एकुण **३२,६००/—**रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**कारवाई क्रं १ :—** मौजा एम. जी. नगर परिसरात **आरोपी १) सिध्दार्थ मोरेश्वर गायकवाड, वय २३ वर्ष, २) आशिक ज्ञानेश्वर गायकवाड, वय १८ वर्ष ३) विकास अनिल गायकवाड, वय १९ वर्ष ४) शुभम मोरेश्वर गायकवाड, वय २० वर्ष, सर्व रा. तारसा रोड, कुसाजी नगर, कन्हान ता. पारशिवनी** हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळतांना मिळुन आले. नमुद आरोपीतांच्या ताब्यातुन १) नगदी १०१०/—रूपये, ५२ तासपत्ते व दोन मोबाईल किंमती १८०००/—रूपये,तसेच ईतर साहित्य असा एकुण किंमती २०,०६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**कारवाई क्रं २ :—** मौजा सत्रापुर कन्हान **परिसरात आरोपी १) रामु गयाप्रसाद यादव, वय ६३ वर्ष, रा. जुना पोलिस स्टेशन समोर, गवळीपुरा कन्हान २) रमेश लल्ला महतो, वय ६३ वर्ष, रा. पिपरी कन्हान ३) राजन भिसे, रा. सत्रापुर, कन्हान ता. पारशिवनी** हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आले. नमुद आरोपीतांच्या ताब्यातुन नगदी ४,४९०/—रूपये, ५२ तासपत्ते व एक मोबाईल किंमती ८०००/—रूपये असा एकुण १२,५४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**दोन्ही कारवाईत ५२ ताशपत्ते व नगदी ५५००/—रूपये , ३ मोबाईल आणि इतर साहीत्य असा एकुण ३२,६००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. वर नमुद आरोपीतांवर महाराष्ट्र जुगार कायदयान्वये ०२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.**

## पोलीस ठाणे काटोल हद्दीतील मेंढेपठार बाजार शिवारात अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद ४१ हजार ५६० रूपयाचा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक १५/०१/२०२६ रोजी काटोल पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की, मौजा मेंढेपठार बाजारा जवळ येथे मोहाफुल हातभट्टीची दारू काढल्या जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच काटोल पोलीसांनी वरीष्ठ पोलीस अधिकारी यांना माहीती देवुन त्यांच्या मार्गदर्शनात नमुद ठिकाणी जावुन कारवाई केली असता **आरोपी अक्षय फत्तुसिंग मारवाडी, रा. मेंढेपठार बाजार, काटोल**

**जि. नागपुर हा** हातभट्टीद्वारे मोहाफुलाची गावठी दारू काढतांना मिळुन आला. सदर हातभट्टी नष्ट करत पोलीसांनी पंचासमक्ष १) ८३० लिटर मोहाफुल सडवा रसायन ,२) २५ लिटर मोहाफुल गावठी दारू ३) एक लोखंडी ड्रम, प्लास्टिक ड्रम इतर साहित्य असा एकुण ४१,५६०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**